अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# लोकमान्यता असलेल्या एसटीला राजमान्यता नाही

सहसा कोणताही सरकारी उपक्रम किंवा उद्योग फायद्यात चालत नाही. फायद्यात चालला तरी तो लोकप्रिय होत नाही. उलट तोट्यात चालणारा एखादा उपक्रम मात्र लोकप्रिय असूनही त्याकडे दुर्लक्ष होते. राज्याच्या परिवहन महामंडळाचे असेच झाले आहे. महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन यावरून एसटी हे छोटेसे नाव या बस उपक्रमाला मिळाले आणि राज्यातल्या खेड्यापाड्यापासून ते शहरापर्यंत एसटीला लोकप्रियता मिळाली. राज्यातल्या कोणत्याही भागात पोहचायचे असेल तर एसटी तुम्हाला घेऊन जाऊ शकते. गेली पन्नास वर्षे सुरू असलेला एसटीचा हा उपक्रम महाराष्ट्रातल्या सामान्य जनतेला वरदान ठरला. अशा प्रकारची लोकमान्यता देशातल्या कोणत्याच सरकारी परिवहन उपक्रमाला मिळालेली नाही. राज्यात ठिकठिकाणी बसस्थानके आणि बसेसचा भला मोठा ताफा त्यातही वेळापत्रक सांभाळण्याचा कसोशीने केला जाणारा प्रयत्न याशिवाय सामान्य माणसाला परवडणारे भाडे ही एसटीची गुणवैशिष्ट्ये ठरली. अशी लोकमान्यता असूनही एसटीला अजूनही मात्र पाहिजे तशी राजमान्यता मिळू शकलेली नाही. पाच वर्षांपूर्वी हे एसटी महामंडळ तोट्यात असल्याची कोल्हेकुई काही स्वार्थी लोकांनी केली आणि त्याच्या खासगीकरणाचा भला मोठा कट आखला गेला. परंतु एसटी कर्मचारी संघटनांच्या जागृतीमुळे तो हाणून पाडला गेला. तोट्यात असलेली एसटी कर्मचाऱ्यांनी जादा परिश्रम घेऊन पुन्हा फायद्यात आणली. आता पुन्हा या एसटीला राज्य सरकारने वाऱ्यावर सोडलेले दिसते. कोणत्याच प्रकारची विशेष मदत करायची नाही. अडचणीत असलेल्या एसटीला सहाय्य करायचे नाही. मात्र आपल्या राजकीय सवंग घोषणांकरीता तिचा वापर करून घ्यायचा. अशा बेपर्वाईमुळे एसटीच्या अस्तित्वाला पुन्हा एकदा घरघर लागली आहे. वेगवेगळे कर एसटीकडूनही वसूल केले जातात. त्यामुळे एसटी महामंडळाचा तोटा आणखीनच वाढत जातो. हे कर वसुल करत असताना राज्य सरकारने एसटीला जो निधी दिला पाहिजे. त्याची देखील पूर्तता होत नाही. आणि मग त्याचा एसटीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत जातो. एसटी महामंडळाला आज समाजातल्या वेगवेगळ्या घटनांसाठी सवलतीने प्रवास उपलब्ध करून द्यावा लागतो. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना सवलतीत प्रवास करू देण्याची योजना राबवली जाते. त्याशिवाय विद्यार्थी वर्गालाही सवलत द्यावी लागते, कैदी आणि पोलिसांना देखील अशाच प्रकारची भाड्यातली सूट एसटीला द्यावी लागते. परंतु या सगळ्या रकमेची पुर्तता राज्य सरकारने करणे अपेक्षित आहे परंतु सरकारी बेपर्वाईमुळे जवळपास आठशे कोटी रुपये सरकारने एसटीला दिलेले नाहीत. यापूर्वीची ३५२ कोटींची थकबाकीसुध्दा दिलेली नाही, अशी जवळपास हजार ते अकराशे कोटीची रक्कम एसटीला मिळायला हवी होती. ती तर मिळालेली नाहीच मात्र प्रवासी कर, डिझेलवरचा व्हॅट कर, मोटारवाहन कर त्याशिवाय जागोजागी भरावी लागणारी टोलची रक्कम यामुळे एसटीचे कंबरडे मोडले जाते.

## एसटीवर एवढे कर कशाला?

खरे तर हा सरकारी उपक्रम असल्यामुळे या सगळ्या करांमधून एसटीला सवलत मिळाली पाहिजे. अन्य राज्यांमध्ये डिझेलवर आकारला जाणारा व्हॅट हा महाराष्ट्रापेक्षा जवळपास सात टक्क्याने कमी आहे. अनेक ठिकाणी तर तिथल्या एसटी महामंडळांना प्रवासी कर आणि टोल भरावा लागत नाही. म्हणूनच अन्य राज्यातल्या एसटीची तिकिटे महाराष्ट्राच्या एसटीपेक्षा कमी असतात. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातच धावणाऱ्या आराम गाड्यांनासुध्दा प्रवासी कर नसल्यामुळे कमी पैशात प्रवासी घेऊन जाणे त्यांना सहज परवडते. स्वाभाविकपणे त्याचा जबरदस्त आर्थिक फटका शेवटी एसटी महामंडळालाच सोसावा लागतो. ज्या एसटी बसेसचा सामान्य माणसाला सर्वात जास्त उपयोग होतो. तो सरकारी उपक्रम आणखी चांगल्या पध्दतीने चालावा. त्यात सुधारणा व्हाव्यात किंवा तो अधिकाधिक फायद्यामध्ये यावा. अशी राज्यकर्त्यांचीच इच्छा दिसत नाही. आज तर एसटीला लोकप्रियताही आहे आणि नफाही मिळतो आहे. तरीदेखील सरकारने या महत्त्वपूर्ण प्रवासी व्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले दिसते. पंचवीस वर्षापूर्वी गाव तिथे एसटी असा संदेश देऊनच तिचा विस्तार केला गेला. अनेक आमदारांनी आपल्या राजकीय सोयीसाठी आपापल्या मतदार संघांमध्ये एसटीचे डेपो करून घेतले. त्याचा लोकांनाही थोडाफार लाभ झाला. गावापासून थेट तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी बस धावू लागल्यामुळे व्यापार व्यवहारालाही चालना मिळाली. आजच्या वेगवान युगामध्ये दळणवळण ही आवश्यक गोष्ट ठरते. रस्ते आणि दळणवळणाची अनेक साधने ही विकासालाच चालना देणारी आहे. ती पायाभूत सुविधाच असल्यामुळे ती अधिकाधिक भक्कम होणे विकासासाठी उपयुक्त ठरते. मुंबईसारख्या मोठ्या शहरात बस लोकल या व्यवस्था असल्यामुळे कामाचा वेग वाढतो. लोकानां रोजगारही उपलब्ध होतो. अनेक जिल्ह्याच्या ठिकाणीसुध्दा एसटीने रोज प्रवास करणाऱ्या नोकरदारांची संख्या वाढते आहे. आपले गाव न सोडता रोजगार कमवण्यासाठी एसटी सहाय्यभूत ठरू शकते. विद्यार्थी वर्गालादेखील याच एसटीमुळे फार मोठा दिलासा मिळत असतो. एक ना अनेक गोष्टींसाठी एसटी ही लोकांच्या पसंतीला उतरेलेली एक खात्रीशीर साधन ठरलेले आहे.

## गरजा पूर्ण करणारी एसटी जगू द्या

दुर्दैवाने सरकारला या गोष्टींची तितकीशी गंभीर जाणीव दिसत नाही. लोकप्रिय किंवा लोकोपयोगी उपक्रम मजबूत करण्याची राजकीय इच्छाशक्तीच सरकारमध्ये दिसत नाही. अन्यथा आज तुटपुंज्या साधनसामुग्रीमध्ये असणारी ही एसटी लोकांना अधिक सुखकर प्रवास उपलब्ध करून देऊ शकते. काळाप्रमाणे व्यावसायिक दृष्टीकोन एसटीने राबवलेला आहे. लोकांना देखील योग्य ते पैसे घ्या पण चांगली सेवा द्या, अशीच एसटीकडून अपेक्षा आहे. मुंबई-पुणे, पुणे-नाशिक किंवा अगदी सातारा मुंबई या मार्गावर चालणाऱ्या एसटीच्या आरामगाड्यांची सुविधा प्रचंड फायदेशीर ठरली आहे. सतत भरून जाणाऱ्या या बसेस मंडळाच्या तिजोरीत मोठी भर घालत असतात. प्रवाशांच्या मागणीमुळेच आता या व्यवस्थांमध्ये सुधारणा करणे एसटीला भाग पडले आहे. वातानुकुलित शिवनेरी बसचा प्रयोग देखील चांगलाच यशवी झाला आहे, अशी सगळी जमेची बाजू असतानाच सरकार मात्र तोट्याच्याच विचार करते आणि मंडळाच्या गरजांकडेही दुर्लक्ष करते. अनेक सरकारी महामंडळे डबघाईला आली असतानाही राजकारण्यांच्या लाल दिव्यांच्या गाड्यांसाठी कोट्यवधींचा निधी उधळला जातो. मुंबईत प्रचंड लोकप्रिय ठरलेला लोकांना उपयोगी वाटणारा आरे दूध विक्रीचा प्रयोग असाच दुर्लक्षित झाला आहे. सरकारला स्वत:चे हितही कळत नाही याचे आश्चर्य वाटते. बाकीच्या महामंडळांचे जाऊ द्या, परंतु लोकांच्या गरजा पूर्ण करणारी एसटी जगू द्या एवढेच आमचे आवाहन आहे.